**सन २०२६ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील दुष्काळी परिस्थिती घोषित केलेल्या २६५ तालुक्यांमध्ये पिक कर्जाचे पुनर्गठन करणे व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सहकार विभाग
शासन परिपत्रक क्र.जीमस.०९२६/प्र.क्र.२४०/२६/२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ३० सप्टेंबर, २०२६.

**वाचा** :- शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग क्र. समिती-२०२६/प्र.क्र. ८२/मदत-२, दि. २५.०९.२०२६

**शासन परिपत्रक :-**

मदत व पुनर्वसन विभागाने सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत उपरोक्त वाचा येथील शासन निर्णय दि. २५.०९.२०२६ अन्वये निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयामध्ये जाहिर केलेल्या उपाययोजनांमध्ये १) पिक कर्जाचे पुनर्गठन व २) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती या सहकार विभागाशी संबंधित सवलती / उपाययोजनांचा समावेश आहे.

मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय दि. २५.०९.२०२६ मधील परिशिष्ट “1” ची प्रत या परिपत्रकासोबत जोडण्यात येत असून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट “1” मध्ये नमूद केलेल्या तालुक्यांमधील शेतकऱ्यांनी खरीप २०२६ मध्ये घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच अशा सर्व तालुक्यातील शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात येत आहे.

खरीप पिक कर्जाच्या परतफेडीचा कालावधी ३१ मार्च असल्याने वरीलप्रमाणे बाधित तालुक्यांमधील जे शेतकरी विहित मुदतीत पीक कर्जाची परतफेड करु शकणार नाहीत अशा शेतकऱ्यांची संमती घेऊन सन २०२६-२७ च्या खरीप हंगामातील पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन करण्यात यावे. खरीप पीक कर्जाच्या पुनर्गठनाची कार्यवाही सर्व बँकांनी दि. ३० एप्रिल, २०२७ पर्यंत पुर्ण करुन अशा शेतकऱ्यांना पुढील खरीप हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे.

या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात येईल याची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे तसेच समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, व्दारा बँक ऑफ महाराष्ट्र, शिवाजी नगर, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०९३०२०१६१९९३४७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.09.30 22:33:43 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. सभापती, विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
४. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
५. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१०. प्रधान सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. जिल्हाधिकारी (सर्व)
१५. मुख्य महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय, पुणे.
१६. समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, व्दारा बँक ऑफ महाराष्ट्र, शिवाजी नगर, पुणे.
१७. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**परिशिष्ट-1**

**खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| **ठाणे** | 1 | ठाणे | निरंक | 0 |
| | 2 | पालघर | निरंक | 0 |
| | 3 | रायगड | श्रीवर्धन | 1 |
| | 4 | रत्नागिरी | रत्नागिरी,संगमेश्वर, राजापूर | 3 |
| | 5 | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली , कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला | 8 |
| **नाशिक** | 6 | नाशिक | मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा | 10 |
| | 7 | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर | 4 |
| | 8 | जळगांव | एरंडोल , पारोळा, धरणगाव ,चोपडा ,पाचोरा , जामनेर, जळगाव ,भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर , यावल, | 15 |
| | 9 | नंदुरबार | अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी | 6 |
| | 10 | अहिल्यानगर | नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता | 14 |
| **पुणे** | 11 | पुणे | भोर, वेल्हा, खेड , शिरूर , बारामती, इंदापूर , दौंड,पुरंदर, | 8 |
| | 12 | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर , बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, | 11 |
| | 13 | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ, | 4 |
| | 14 | सातारा | सातारा,खटाव, माण, फलटण, खंडाळा महाबळेश्वर | 6 |

**परिशिष्ट-1**

**खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| | 15 | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड,आजरा, चंदगड, | 6 |
| छ. संभाजीनगर | 16 | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री | 9 |
| | 17 | जालना | बदनापूर ,घनसावंगी अंबड , जालना परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद | 8 |
| | 18 | बीड | बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी, | 11 |
| | 19 | लातूर | लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट | 10 |
| | 20 | धाराशिव | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा | 8 |
| | 21 | नांदेड | नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव | 14 |
| | 22 | परभणी | पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | 9 |
| | 23 | हिंगोली | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव , वसमत | 5 |
| अमरावती | 24 | बुलढाणा | जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा | 13 |
| | 25 | अमरावती | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | 14 |
| | 26 | अकोला | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर बार्शीटाकळी | 7 |

**परिशिष्ट-1**

**खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| | 27 | वाशिम | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर ,कारंजा ,मानोरा | 6 |
| | 28 | यवतमाळ | यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव,वणी, मारेगाव, झरी -जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव | 16 |
| नागपुर | 29 | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी | 7 |
| | 30 | नागपूर | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा,उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर | 14 |
| | 31 | भंडारा | भंडारा, पवनी, लाखंदूर | 3 |
| | 32 | गोंदिया | तिरोडा | 1 |
| | 33 | चंद्रपूर | चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी , राजूरा कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा | 12 |
| | 34 | गडचिरोली | गडचिरोली, चार्मोर्शी | 2 |
| | **एकूण तालुके** | | | 265 |